2018-19

Mr. R. G. ...

48/2019

Impact Factor – 6.261 Special Issue - 124 B Feb. 2019 ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

UGC Approved Journal

**Multidisciplinary International E-research Journal**


# महिलांची सुरक्षितता व सशक्तीकरण अंतर्गत महिलांमध्ये करावयाची सामाजिक व कायदेविषयक जाणीव जागृती

आयोजक

**चाळीसगांव एज्युकेशन सोसायटीचे**

**बी.पी. आर्टस्, एस.एम.ए. सायन्स, अॅन्ड के.के.सी. कॉमर्स कॉलेज**

**चाळीसगाव, जि. जळगाव.**



■ GUEST EDITOR ■

**Principal Dr. Milind Bildikar**

■ EXECUTIVE EDITOR ■ **Dr. Dilipsingh Nikumbh**

■ ASSOCIATE EDITOR ■ **Mr. Ravindra Patil**

■ CHIEF EDITOR ■ **Mr. Dhanraj T. Dhangar**

RESEARCH JOURNEY

MULTIDISCIPLINARY ONLINE RESEARCH JOURNAL

**This Journal is indexed in :**

- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmoc Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- Universal Impact Factor (UIF)
- International Impact Factor Services (IIFS)
- Indian Citation Index (ICI)
- Dictionary of Research Journal Index (DRJI)

Smt. Sindhutai Jadhav Maha Mehkar 330

For Details Visit To : www.researchjourney.net

SWATIDHAN PUBLICATIONS

Scanned by TapScanner

| | | |
|---|---|---|
| २२ | महिला आरक्षण विधेयक का मूल्यांकन<br>प्रा. जयेश विक्रम पाडवी | ०५२ |
| २३ | भारतीय संविधान में नारी<br>प्रा.डॉ. सुनीता कावळे | ०५६ |
| २४ | मानवधिकार : महिलाओ की सद्य:स्थिती<br>प्रा.डॉ. रणजित के. पवार | ०५९ |
| २५ | महिला सुरक्षा विषयक सामाजिक आंदोलन एवं कानूनी अधिकार<br>प्रा. पोपट भावराव बिरारी | ०६१ |
| २६ | भारतीय महिलाओं का स्थान और दर्जा<br>प्रा. राजेंद्र वसंतराव जाधव | ०६४ |
| २७ | स्त्री मुक्ती आणि धार्मिक अडसर<br>प्रा अशोक नथुराम डिंबर | ०६६ |
| २८ | पंचायतराज मधील आरक्षण धोरणाने महिला विकासाला प्रेरणा<br>डॉ. राजेंद्र नाडेकर | ०६९ |
| २९ | महिलांचे घटनात्मक व कायदेविषयक अधिकार<br>सहा. प्रा. पुनम भिमराव जमधडे डॉ. शैलजा डोंगर भंगाळे | ०७१ |
| ३० | राष्ट्रीय महिला सबलीकरण धोरण २००१ ची उद्दिष्टये व सद्य स्थितीचा अभ्यास<br>सहा. प्रा. संभाजी भिमराव जमधडे | ०७५ |
| ३१ | महिला सक्षमीकरण : घटनात्मक अधिकार आणि पंचायतराज व्यवस्थेतील आरक्षण<br>डॉ. अमर के. बोंदरे | ०७७ |
| ३२ | भारतातील अनुसूचित जमातींमधील महिलांची शैक्षणिक स्थिती<br>प्रा. जयेश विक्रम पाडवी, प्रा.डॉ.विजय तुंटे | ०८० |
| ३३ | महाराष्ट्रातील पंचायत राज्यव्यवस्थेत महिलांचा सहभाग<br>प्रा. डॉ. आर. जी. सुरळकर | ०८३ |
| 34 | **Socio-Legal Study On Violence Against Women : Causes And Remedies**<br>Dr. Rekha Pahuja | **086** |
| 35 | **Role Of Ngo's Towards Protection Of Women In India**<br>Prof. Govindaraja A. Bhatta | **089** |
| 36 | **Globalization And Its Impact On Women In India**<br>Dr. Vivek M. Diwan | **092** |
| 37 | **Human Right And Female Foeticide : Ther Impact Of Sex Ratio In India**<br>Prof. Vijay D. Chaudhari | **094** |
| 38 | **Women's Political Empowerment : Issues and Challenges**<br>Prof. Ketaki Milind Chaudhari | **096** |
| 39 | **Womans' Economic Empowerment through SHG and Commercial Banks in Jalgaon District : The Comparative Study**<br>Mrs. K.S. Khaparde, Dr. A.D. Yeole | **098** |
| 40 | **Woman is best administrator in working culture and work place Environment**<br>Dr. Rajkumar M. Sharma, Dr. Rachana R. Pachori | **101** |
| 41 | **An Analytical Study of Women's Empowerment through Political Participation in India**<br>Jadhav Babasaheb Kailas | **102** |
| 42 | **Educational Attainment of Women in India**<br>Ratnakar Subhash More, Dr. P.S. Baviskar | **105** |


Smt. Chutai Jadhav Maha Mehkar 330



Scanned by TapScanner

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.261
Special Issue 124 B : महिलांची सुरक्षितता व सशक्तीकरण अंतर्गत महिलांमध्ये करावयाची सामाजिक व कायदेविषयक जाणीव जागृती
ISSN : 2348-7143
Feb. 2019

# महाराष्ट्रातील पंचायत राज्यव्यवस्थेत महिलांचा सहभाग

प्रा. डॉ. आर. जी. सुरळकर
श्रीमती सिंधुताई जाधव कला व विज्ञान महाविद्यालय, मेहकर

पारंपारिक भारतीय समाजव्यवस्था पुरूषप्रधान अशीच राहिलेली आहे. भारतीय समाजात महिलांना अनेक अधिकारपासून वंचित ठेवण्यात आलेले होते. या पुरूषप्रधान समाजव्यवस्थेमुळे स्त्रियांना सदैव दुय्यम स्थान प्राप्त झाले होते. त्यामुळे स्त्री –पुरु ष विषमता निर्माण झाली. घ्चुल आणि मुलङ हेच स्त्रियांचे कार्यक्षेत्र आहे असे मानले जाऊ लागले. आर्थिक,सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, धार्मिक, राजकीय यासारख्या सर्व क्षेत्रात स्त्रियांच्या सहभागावर अनेक बंधने लादण्यात आलीत.वेदपुर्वकाळ, वैदिककाळ,स्मृती व आर्य महाकाव्याचा काळ आणि आधुनिक काळ अशा चार भागात स्त्रियांच्या समाजातील स्थानात स्थितंतरे झालीत. तिच्या ठायी क्षमता असुनही त्याची जाणीव तिला कधीच होवू दिली नाही. निर्णय प्रक्रियेतील तिचा सहभाग नाकारु न तिचे विश्व चार भिंतीत बंदिस्त केले गेले. राजाराम मोहन रॉय , महात्मा ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले, महर्षि धोंडो केशव कर्वे. यासारख्या सुधारणावादी समाजसुधारकांनी केलेल्या प्रयत्नामुळे खऱ्या अर्थाने स्त्रिमुक्तीचा मार्ग मोकळा झाला आहे.

२० व्या शतकातील समाजसुधारकांच्या प्रयत्नामुळे महिलांना शिक्षणाची द्वारे खुली झाली. यामुळे महिलांना समाजाच्या विविध क्षेत्रात पुरु षाच्या बरोबरीने सहभागी होणे शक्य झाले व महिलांचा राजकीय सहभाग वाढला. भारत स्वातंत्र्य झाल्यानंतर देशातील सर्व नागरिकासांठी न्याय, स्वातंत्र्य,समता, बंधुता या मूल्यांना महत्व देणारी राज्यघटना स्विकारण्यात आली. यामुळे संपुर्ण देशात पुन्हा एकदा घ्स्त्री - पुरूषङ समानता हा वैचारिक लढा सुरु झाला. याचा परिणाम म्हणून पुरूषप्रधान संस्कृतीचे वर्चस्व बऱ्याच प्रमाणात कमी झाले. जगातील अनेक देशांच्या तुलनेत भारतीय समाजव्यवस्थेत पुरूषप्रधान संस्कृतीचे वर्चस्व कमी झालेले दिसत नाही. असे असले तरी मात्र भारत सरकारने महिलांच्या समाज जीवनात सर्वांगिण परिवर्तन घडवून आणण्यासाठी अनेक कायदे केले आहेत.राज्यघटनेतील कलम १४, १५ व ३२६ नुसार स्त्री–पुरु ष समानतेबाबत विविध तरतूदी करण्यात आल्या. या तरतुदीमुळे मानवी जीवनाच्या विविध क्षेत्रात स्त्रियांच्यासहभागाचे प्रमाण बरेच वाढले आहे. हे मान्य केले तरीही विशेषत आर्थिक व राजकीय क्षेत्रामध्ये पुरूषांच्या तुलनेत स्त्रियांच्या सहभागाची संख्या बऱ्याच प्रमाणात कमी असल्याचे दिसून येते.

जगातील सर्व देशामध्ये स्थानिक पातळीपासून तर राष्ट्रीय स्तरापर्यतच्या राजकारणात सहभागी होणाऱ्या स्त्रीयांची संख्या बऱ्याच प्रमाणात वाढली आहे. तरीही नजीकच्या काळात स्त्री –पुरु ष समानता निर्माण होईल असे म्हणता येत नाही. असे असले तरी मात्र पंचायत राज्य व्यवस्थेतील स्थानिक स्वशासन संस्थामध्ये स्त्रियांना अधिकाधिक संधी उपलब्ध करून देण्याच्या प्रयत्नामुळे महिला सबलीकरणाची प्रक्रिया अधिक गतिमान झालेली दिसून येते. यामुळे पंचायत राजव्यवस्थेत महिलांच्या सहभागाचे अध्ययन करणे आवश्यक झाले आहे. महाराष्ट्रातील पंचायत राजव्यवस्थेत महिलांच्या राजकीय सहभागाचा अभ्यास पुढील मुद्याच्याआधारे करता येईल.

**पंचायत राज्याची स्थापना**

भारतात ब्रिटिश काळात पंचायत राजव्यवस्था विकसित झाली. स्वतंत्र भारताने लोकशाही विकेंद्रीकरणाच्या तत्वाचा स्विकार केला. यासाठी अखंड भारतात ग्रामविकासाची पध्दती सुव्यवस्थितपणे अमलात यावी म्हणून बलवंतराय मेहता यांच्या अध्यक्षतेखाली २६ जानेवारी १९५७ रोजी समिती गठीत करण्यात आली. या समितीने ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद अशी त्रिस्तरीय पंचायत राज योजना संपूर्ण भारतात सुरु करावी अशी शिफारस सरकारला केली. १९५२ पासून पंचायत राज कायदा अमलात येईपर्यंत राष्ट्रीय विकास मंडळ व सार्वजनिक विकास मंडळ कार्यरत होते. १९५८ नंतर मात्र पंचायत राज कायदा आस्तित्वात आला. मेहता समितीच्या या त्रिस्तरीय व्यवस्थेला पं. जवाहरलाल नेहरु नी पंचायतराज असे नाव दिले. सत्तेचे विकेंद्रीकरण करण्यासाठी भारताने संघराज्यात्मक व्यवस्थेचा स्विकार केला. अधिकाराची विभागणी केंद्रसुची, राज्यसूची व समवर्ती सुचीमध्ये करण्यात आली. राष्ट्रीय व राज्य पातळीवर प्रादेशिक आस्मितेतेचे संरक्षण करण्याची परवानगी दिली. विकेंद्रीकरण हा लोकशाहीचा आत्मा आहे. स्थानिक स्वराज्य संस्था हया नागरिकांवर संस्कार करणाऱ्या पाठशाळा आहेत. त्यामुळे लोकशाही बळकट होण्यासाठी स्थानिक पातळीवरु न प्रयत्न करणे गरजेचे आहे. तसे प्रयत्न स्वातंत्र्यपुर्व काळापासूनच सुरु होते.

प्राचीन भारतात खेडयांच्या विकासाची संकल्पना आस्तित्वात आली पाहिजे. या सर्व गोष्टीचा विचार करु न महात्मा गांधीनी घ्ग्राम स्वाराज्याचीङ कल्पना मांडली. दि.२ ऑक्टोबर,१९५९ मध्ये भारतातील राजस्थानमधील घ्नागोरङ जिल्हयामध्ये पं.जवाहरलाल नेहरु च्या हस्ते पंचायत राजची सुरु वात झाली. ११ ऑक्टोबर, १९५९ मध्ये आंध्रप्रदेश, तर १९६० मध्ये घ्आसामङ मध्ये पंचायतराजला प्रारंभ झाला. त्यानंतर मद्रास, कर्नाटक, ओरिसा, पंजाब या राज्यांनी पंचायत राज व्यवस्थेची सुरु वात केली. दि. १ मे १९६० रोजी महाराष्ट्र हे पंचायत राज व्यवस्थेचा स्विकार करणारे ९ वे राज्य ठरले आहे. आणि पश्चिम बंगाल १० व्या क्रमांकाचे राज्य ओळखले जाते.

पंचायतराज समितीत बलवंतराय मेहता १९५७, जी.के संस्थानय १९६२,अशोक मेहता १९७७, वसंतराव नाईक समिती-१९६०, एल. एन. बोंगीरवार - १९७०, प्राचार्य पी.बी पाटील -१९८४, एल. एन. सिंघवी - १९८६, सरकारीया आयोग १९८८, थुंगण - १९८८ इत्यादी, समित्यांनी महत्वाची भूमिका बजावली.

**७३ व ७४ व्या घटनादुरु स्तीची पार्श्वभूमी**

देशाच्या विकासाच्या दृष्टीने पंचायत राज्याचे महत्व ओळखून त्याला आपल्या राजकीय कार्यक्रमात महत्वाचे स्थान देण्याचा निर्णय भारताने माजी पंतप्रधान राजीव गांधी यांनी घेतला. दारिद्र्यरेषेखालील लोकांसाठी केंद्रसरकारच्या योजना राज्य सरकारद्वारे व त्यांच्या सहभागाने राबविणे शक्य होते. मात्र पंचायत राज व्यवस्थेविषयी राज्यसरकारे उदासिन होती. देशातील लोकशाही व्यवस्थेमध्ये घ्पंचायत राज व्यवस्थेलाङ स्वायत्त संस्था म्हणून स्थान द्यावयाचे असेल तर त्यांच्या मूलभूत व्यवस्थेची तरतुद असणारी घटनादुरु स्ती करण्याचे नक्की ठरले. त्यासाठी ६४ वे घटनादुरु स्ती विधेयक लोकसभेपुढे मांडण्यात आले. लोकसभेने ते १९८९ च्या ऑगष्टमध्ये मंजूर केले. परंतु कॉंग्रेस या सत्ताधारी पक्षाला राज्यसभेत बहुमत नसल्यामुळे या विधेयकाला राज्यसभेची मंजुरी मिळाली नाही. त्यानंतर त्यांनी ते विधेयक पुन्हा दुसऱ्यादा १९९० च्या सप्टेंबर महिन्यात व्ही.पी. सिंग याच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय आघाडी सरकारने लोकसभेत मांडले परंतु बिलावर चर्चा घेण्यापूर्वीच राष्ट्रीय आघाडी सरकार कोसळले. लोकसभा बरखास्त झाली. त्यामुळे ते विधेयक



330

Scanned by TapScanner

आपोआप बारगळले. त्यानंतर ते विधेयक पी. व्ही. नरसिंहराव सरकारने सप्टेंबर १९९१ मध्ये लोकसभेत तिसऱ्यांदा मांडले. त्याला २२ डिसेंबर १९९२ ला मंजुरी दिली. दुसऱ्याच दिवशी म्हणजे २३ डिसेंबर १९९२ रोजी राज्यसभेने मंजुर केले. अशाप्रकारे केंद्रसरकारने पचायत राज्य पध्दतीला बळकट करणारी ७३ वी घटनादुरु स्ती केली. राष्ट्रपतीनी त्या दुरु स्तीला २० एप्रिल १९९३ रोजी मान्यता दिली आणि भारतात तिची अमलबजावणी २४ एप्रिल १९९३ पासून सुरु झाली. केंद्रसरकारने राज्य सरकारांना पंचायती राज्य पध्दती सुरु करण्याकरीता कायदे करण्यास सांगितले. लोकसभेने ७३ वी व ७४ घटना दुरु स्ती कायदा केला. महाराष्ट्र राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री मा. शरद पवार यांनी ३१ मे १९९४ पासून घटनादुरु स्तीची अमलबजावणी महाराष्ट्रात सुरु केली.

**७३ व ७४ व्या घटनादुरु स्तीनुसार राज्यघटनेत करण्यात आलेला बदल**

७३ व ७४ व्या घटनादुरु स्ती कायद्याने ‘पंचायतीड या शिर्षकाखाली भाग ९ अ हा नवा भाग राज्य घटनेमध्ये समाविष्ट करण्यात आला आहे. त्यामध्ये कलम २४३ ते कलम २४३–ओ अशी कलमे समाविष्ट कलेली आहेत. याशिवाय या कायद्याने राज्य घटनेला ११ वे परिशिष्ट जोडले असून त्यामध्ये पंचायत राज संस्थेच्या अधिकार कक्षेत येणाऱ्या विषयाची माहिती दिली आहे. या घटनादुरु स्तीमुळे पंचायत राज्यांची स्थापना करण्याचे बंधन प्रत्येक राज्यावर घातले आहे. त्यामुळे राज्यांची ती आता घटनात्मक जबाबदारी ठरली आहे. ७३ व्या घटनादुरु स्तीनुसार स्थानिक शासनव्यवस्था आणि ७४ व्या घटनादुरु स्तीनुसार नागरी शासन व्यवस्थेविषयी स्वतंत्र तरतुदी करण्यात आल्या, या घटनादुरु स्तीमुळे झालेले महत्वपुर्ण बदल पुढीलप्रमाणे आहेत.

१) ७३ व्या घटनादुरु स्ती कायद्यानुसार स्थानिक शासनव्यवस्था अधिक सक्षम, सामर्थ्यशील व स्वयंपुर्ण बनू शकतील आणि राष्ट्रीय विकासाला हातभार लावू शकतील.
२) ग्रामसभेला कायदेशीर दर्जा प्राप्त झाला.
३) ग्रामपंचात, पंचायतसमिती व जिल्हापरिषद या त्रिस्तरीय ग्रामीण शासनव्यवस्थेत राखीव जागा, त्याचे अधिकार व कार्यकाल या संदर्भात तरतुदी करण्यात आल्या.
४) आर्थिक उत्पन्नाचा दर, राज्य वित्त आयोग, निवडणूक आयोग, न्यायालयीन हस्तक्षेपास प्रतिबंधक इ. तरतुदी करण्यात आल्या .
५) ७४ व्या घटना दुरु स्तीने नागरी शासनव्यवस्थेविषयी स्वतंत्र तरतुदी करण्यात आल्या.
६) राखीव जागेसंबंधी, नागरी शासनव्यवस्थेच्या रचनेबाबत, विभागीय समित्या, स्थानिके शासनव्यवस्थेच्या कार्याबाबत,जिल्हानियोजन समिती, महानगर नियोजन समिती इत्यादी संदर्भात तरतुदी करण्यात आल्या .
७) ग्रामीण व नागरी क्षेत्रातील प्रत्येक पंचायतीमध्ये पंचायत क्षेत्रातील एकूण लोकसंख्येत अनुसूचित जाती/जमातींच्या दृष्टीने अनिवार्य आरक्षणाची तरतुद करण्यात आली आहे.

या आरक्षणामध्ये या जातीतील महिलांना १/३ म्हणजे ३३ टक्के जागा राखीव ठेवण्याची तरतुद करण्यात आली आहे. या स्थानिक शासनव्यवस्थेतील सरपंच,पंचायत समिती व जिल्हा परिषद अध्यक्ष,नगराध्यक्ष,महापौर यासारख्या पदासाठी ३३ टक्के पदे महिलासाठी राखीव ठेवण्याची तरतुद केली आहे. काही घटकराज्यामध्ये महिलांसाठी ५० टक्के आरक्षण देण्यात आले आहे. थोडक्यात ७३ व ७४ व्या घटनादुरु स्तीमुळे महिलासाठी ५० टक्के आरक्षण आणि अनूसूचित जाती/ जमाती व दुर्बल घटकांसाठी आरक्षणाच्या तरतुदी करण्यात आल्या आहेत.

**महाराष्ट्रातील पंचायत राजव्यवस्थेत महिलांचा सहभाग**

भारतीय संविधानातील कलम २४३ (ड) मध्ये घटनादुरु स्ती विधेयक २००९ मंजुर करु न स्थानिक स्वशासनामध्ये महिलांना ५० टक्के आरक्षण देण्यात आले आहे. महाराष्ट्र शासनाने याच आधाराव ११ मे २०११ रोजी महाराष्ट्रातील स्थानिक सशक्तीकरणाला चालना देणारा निर्णय घेतला. स्वराज्य संस्थांच्या स्तरावर महिलांना मिळालेल्या राजकीय आरक्षणातून महाराष्ट्रामध्ये सद्यास्थीतीत एकूण ३४ जिल्हापरिषदा, ३५५ पंचायत समिती आणि २८,८१३ ग्रामपंचायती आहेत. महाराष्ट्रातील नागरी क्षेत्रात २२६ नगरपरिषदा,आणि २७ महानगरपालिका आहेत. विशेषत: महाराष्ट्र शासनाने स्थानिक स्वशासन संस्थामधील महिलांना मिळालेले ३३ टक्के आरक्षण वाढवुन ५० टक्के केले आहे. महाराष्ट्र राज्य निर्वाचन आयोगाने क्राती ज्योती योजनेअंतर्गत ६६१जिल्हापरिषद सदस्य,१५ जिल्हा परिषद अध्यक्ष, ग्रामपंचायतीमध्ये १,०१४६६ सदस्य, तसेच ३२,४६३ म्हणजे (४९.९) टक्के सरपंच यासारखी पदे महिलासांठी आरक्षित ठेवण्यात आली आहेत. वरील तरतुदी नुसार महाराष्ट्रातील पंचायत राज व्यवस्थेत महिलांच्या राजकीय सहभागाचे प्रमाण मोठया प्रमाणात वाढले आहे असे म्हणावे लागेल.

महिला आरक्षणाच्या माध्यमातून आज मोठया प्रमाणात महिला नेतृत्वाचा विकास होत आहे. आज संपूर्ण देशात ६ लाख ग्रामपंचायत महिला सदस्या आहेत. २५ हजाराहून अधिक स्त्रिया सरपंचपदी आहेत. ३७५२३ पंचायत समिती सदस्या असून १२२ जिल्हा परिषद अध्यक्षा आहेत. साधारणत: ७ लाख स्त्रियांचा राजकीय व्यवस्थेतील सहभाग वाढला असल्याचे दिसून येते. महाराष्ट्रामध्ये एक लक्ष स्त्रिया ग्रामपंचायतीवर निवडून आल्या, ८५०० स्त्रिया सरपंच झाल्या, १० जिल्हापरिषदांचे अध्यक्ष तर ९८ स्त्रिया पंचायत समितीच्या अध्यक्ष आहेत. महिलांच्या आरक्षणामुळे महिलांचा राजकीय क्षेत्रातील सहभाग वाढला असून समाजाच्या सर्वच क्षेत्रात महिला नेतृत्व विकसित होतांना दिसत आहे.

**राजकारणातील महिला सहभागाच्या समस्या**

जगातील सर्व देशामध्ये महिलांच्या राजकीय सहभागाचा संबंध महिला सशक्तीकरणाशी आहे. राजकारणातील महिला सहभागाचे मूल्यांकन केल्यास असे दिसून येते की, महिलांची राजकारणातील स्थिती निराशजनक आहे. भारतातील महिला राजकीय नेतृत्वाच्या अध्ययनावरु न असे स्पष्ट होते की, महिलांचे मताधिकार, राजकारणातील स्थिती, सहभाग, शक्ती, प्रभाव क्षमता, स्वतंत्रपणे राजकारणातील घेतलेले निर्णय याबाबत महिला नेतृत्व समाधानकारक वाटत नाही. यावरु न महिलांच्या राजकारणातील सहभाग संबंधी समस्याचे विवेचन पुढीलप्रमाणे करता येईल.

१) पुरु षांचा एकाधिकार :- भारतीय समाज परंपरेनूसार पुरु षप्रधान राहिलेला आहे. भारतीय पुरु षांच्या अहंकारी प्रवृत्तीमुळे राजकारणाच्या क्षेत्रात त्याची एकाधिकारशाही निर्माण झाली आहे. भारतीय समाजात महिलांच्या स्वतंत्रेकडे संशयाच्या नजरेने पाहिले जात असते. त्यामुळे राजकीय सहभागात महिला नेतृत्वाला वाव मिळत नाही.
२) राजकीय सामाजिकीकरणाचा अभाव :- भारतीय समाजामध्ये राजकारण हे पुरु षांचे क्षेत्र आहे.तो महिलांचा प्रांतच नाही.अशाप्रकारची मानसिकता रु जवली गेली आहे. अशा या मानसिकतेमुळे महिलांना समाजाकडून जी प्रेरणा मिळायला पाहीजे ती मिळत नाही. या कारणामूळे महिलांच्या सक्रीय नेतृत्वात अडथळे निर्माण होतात.



Scanned by TapScanner

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal | ISSN : 2348-7143
Impact Factor - (SJIF) - 6.261 | Feb. 2019
Special Issue 124 B : महिलांची सुरक्षितता व सशक्तीकरण अंतर्गत महिलांमध्ये कायद्याची सामाजिक व कायदेविषयक जाणीव जागृती

३) महिला वर्गाची मानसिकता :- भारतीय समाज परंपरेत महिलांचा दर्जा कौटूंबिक जबाबदारी सांभाळण्यापुरता मर्यादित राहिलेला आहे. राजकारण हे महिलांसाठी नसते अशी भय व तिरस्काराची भावना महिलावर्गात निर्माण झाली आहे. स्त्रियांसाठी आरक्षणाची तरतुद झालेली असतांना देखील केवळ राजकारणविरोधी मानसिकता यामुळे निर्माण झाली आहे.

४) गुंड प्रवृत्तीचा प्रभाव :- राजकारणाचे गुन्हेगारीकरण हे मुध्दा राजकारणातील महिलाचा सहभाग कमी असण्याचे एक कारण आहे. भारतीय राजकारणाच्या गुन्हेगारीकरणात महिला सुरक्षित अजिबात राहू शकत नाही. कारण महिलांचा अशा वातावरणातील तणाव सहन होत नाही. या भितीचा परिणाम त्यांचा नेतृत्व व सहभागावर झालेला दिसतो.

५) राजकीय पक्षाची दुय्यम भूमिका:- राजकीय पक्षाच्या कार्यपध्दतीवरु न असे दिसून येते की, महिला सहभाग किंवा नेतृत्वाच्या बाबत त्यांची भूमिका दुय्यम स्वरु पाची आहे. महिलाचा विचार फक्त आरक्षित जागांसाठीच केला जातो. मात्र महिलांचा पक्षीय कार्यकारीणीतील सहभाग जाणीवपूर्वक टाळला जातो. यामुळे महिला नेतृत्व निर्माण होण्यास अडथळा निर्माण होतो.

६) सांस्कृतिक चालिरीती :- भारतीय समाजातील रु ढी,चालीरीती परंपरेनूसार महिलांना कौटूंबिक वातावरणाच्या बाहेर वावरण्यावर अनेक बंधने असतात. त्यामूळे त्यांना राजकारणात सक्रीयपणे सहभागी होणे शक्य होत नाही.

७) राजकीय जागरू कतेचा अभाव :-महिलामध्ये राजकीय जागरू कतेचा अभाव असूनही आरक्षण तरतुदीने त्या राजकारणात सहभागी होतांना दिसत आहेत . मात्र राजकारणात महिला स्वत: निर्णय न घेता काही वेळा तिचा पती, मुलगा निर्णय घेत असतात.त्यामुळे राजकारणातील महिलांची स्वतंत्र सहभागाची जागृती दिसून येत नाही.

**महाराष्ट्र पंचायत राजव्यवस्थेत महिला नेतृत्वाचा विकास**

१९९० च्या दशकातील ७३ व ७४ व्या घटनादुरूस्तीमुळे ग्रामीण व नागरी क्षेत्रातील पंचायत राज व्यवस्थेत स्त्रियांचा राजकीय सहभाग मोठया प्रमाणात वाढला असून आज सर्वच क्षेत्रात महिला सक्षम ठरत आहेत. च्चूल आणि मूलङ एवढेच मर्यादित कार्यक्षेत्र असणाऱ्या महिलांना ३३ टक्के व नंतर ५० टक्के आरक्षण प्राप्त झाल्यामुळे खऱ्या अर्थाने महिलांचा राजकीय सहभाग तीव्र वाढला असून महिला सशक्तीकरणाची प्रक्रिया अधिक गतिमान बनली आहे. पंचायत राज व्यवस्थेत ग्रामीण भागातील महिलांना नेतृत्व करण्याची संधी मिळाली आहे. यामुळे समाजाच्या विविध स्तरावर महिला नेतृत्वाचा उदय झालेला आहे. आरक्षणामुळे महिला निर्णय प्रक्रियेत सहभागी होत आहेत. राजकारणातील प्रत्यक्ष सहभागामुळे त्यांना राजकीय प्रशिक्षण प्राप्त होत आहे. राजकीय क्षेत्रात योग्य संधी आणि स्थानिक शासनातील सहभाग यामुळे महिलांचे राजकीय सामाजिकीकरण घडून येत आहे.

भारतीय राजकारणावर महिला आरक्षणाचा व्यापक प्रभाव राहिला आहे. एवढेच नव्हे तर २००१ हे वर्ष महिला सबलीकरण वर्ष म्हणून घोषित केले. राजकारणातील आरक्षणामुळे महिलांचा सर्वच क्षेत्रात, विकास होत आहे. विज्ञान तंत्रज्ञान व शिक्षण क्षेत्रात, वैद्यकीय क्षेत्रात, व्यापार उद्योग क्षेत्रात. क्रिडा क्षेत्रात, महिला स्वत:चे कर्तृत्व व बुध्दीमत्ता सिध्द करत आहेत.आधुनिक काळात केवळ राजकीय क्षेत्रातच नव्हे, तर सामाजिक व आर्थीक क्षेत्रातही महिला नेतृत्वाचा विकास झाला आहे ग्रामीण भागात महिला बचत गटांच्या माध्यमातून आर्थिक क्रांतीला व महिला सबलीकरणाला चालना मिळत आहे. थोडक्यात १९९३ मध्ये झालेल्या ७३ व ७४ व्या घटनादुरु स्ती कायद्यामुळे महाराष्ट्र पंचायतराज व्यवस्थेत महिलांना आरक्षण देवून महिलांच्या आर्थिक व सामाजिक उत्कर्षाचा पाया रोवला आहे. ग्रामीण व नागरी भागातील महिलांच्या राजकीय सहभागाचे प्रमाण वाढले असून महिला नेतृत्वाचा मोठया प्रामाणात विकास व उदय झालेला दिसून येत आहे.

**संदर्भ**

१. चव्हाण शांताराम, गवई सुभाष, भारतीय राज्यव्यवस्था : वेदमुद्रा प्रकाशन, टोपे नगर, जुलै २०१०.
२. देशमुख ,अलका: स्थानिक स्वशासन,साईनाथ प्रकाशन, धरम पेठ, नागपूर, प्रथमावृत्ती,३ नोव्हेंबर,२०१३
३. भोळे, भा.ल. भारतीय लोकशाहीचे संविधानातील आधार, भारताचे शासन व राजकारण, पिंपळापूरे प्रकाशन, नागपूर, पृ.क्र.५६.
४. शेलकर ॲड अभया, महाराष्ट्र नगर पालिका, नगर पंचायत व औद्योगिक नागरी अधिनियम १९६५ नाशिक, लॉ हाऊस प्रकाशन, नाशिक, चौथी आवृत्ती २०१२
५. चौधरी हिदत्तात्रेय मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ ,चौधरी लॉ प्रकाशन,जळगांव ३१ आवृत्ती,२०१२.
६. पाटील बी.टी. घ्महाराष्ट्रातील पंचायतराज,ङ के सागर प्रकाशन ,पुणे जानेवारी २०११
७. गवई ,डॉ.सुभाष विधे प्रा. प्रशांत चकवे प्रा. सुनील: महाराष्ट्रातील पंचायतराजचीवाटचाल प्रकाशक वेद मुद्रा टोपे नगर, अमरावती २३ मार्च २०१२ .

मासिके -
१. जनप्रतिनिधी अधिनियम -२००९
२. प्रतियोगिता दर्पण ,समसामयिक वार्षिक २०१२,खंड-२, २०१५.
३. भारत २०१५, वार्षिक प्रकाशन विभाग, सूचना और प्रसारण मंत्रालय , भारत सरकार नवी दिल्ली.
४. महाराष्ट्र वार्षिक २०१५, युनिक अॅकॅडमी, पुणे.
५. क्रॉनिकल इयर बुक- २०१३ कॉनिकल बुक्स पब्लिकेशन्स प्रा.लि.नवी दिल्ली.
६. जनप्रतिनिधी अधिनियम -२००३.

330
Coordinator - IQAC
Smt.Sindhutai Jadhao College
Mehkar.Dist.Buldana
Scanned by TapScanner